/4484/

जा.क्र.साआ/प्रशा.2/मशिपु/समि.काम./ /2019
साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे -05
ई-मेल- commsugar.adm@gmail.com
दिनांक - 21/02/ 2019

**:- परिपत्रक :-**

**विषय- सहकारी साखर कारखान्यांना लागणा-या नॉन क्रिटीकल मशिनरी (Non-critical equipments) व त्यांचे सुटे भाग पुरविणा-या पुरवठादारांच्या नोंदणीबाबत.**

**वाचावे-** 1. या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.साआ प्रशासन/पुरवठादार नोंदणी सहभाग/ अटी/517/2012 दि. 10/10/2012.
2. भारत सरकारचे कृषी व सहकार विभागाचे कार्यालयीन आदेश दि. 23/ 06/2015
3. मुख्य संचालक, राष्ट्रीय सहकारी विकास निगम यांचे पत्र दि. 02/07/2015
4. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना संघ लि. (NFCSF) यांचे पत्र जा.क्र.IA-110/Vir no.79 दि.14/12/2017
5. या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र.साआ/प्रशा2/मशि. पुरवठादार/निकष/18 दि.31.07.2018
6. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना संघ लि. (NFCSF) यांचे पत्र IA-87/2019/1756 दि.06.02.2019 व दि.12.02.2019.
7. महासंचालक, वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट, मांजरी, पुणे यांचे पत्र व्ही.एस.आय./डी.जी. /5864/2018-19 दि.13.02.2019.
8. कार्यकारी संचालक, वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन यांचे पत्र दि.15.02.2019.
9. सचिव, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि. यांचे पत्र सं.क्र..वाणिज्य/ 844/2018-19 दि.16.02.2019.

1/- राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना लागणा-या नॉन क्रिटीकल स्वरुपाच्या मशिनरी संदर्भात यंत्रसामुग्री पुरवठादारांची नोंदणी सन 2012 पासुन संदर्भ क्र. 1 नुसार करण्यास सुरुवात केली व वेळोवळी साखर आयुक्तालय स्तरावर समिती गठीत करुन यंत्रसामुग्री पुरवठादारांची नोंदणी करण्यात येत होती.

2/- केंद्र शासनाने सहकारी साखर कारखान्यांना लागणारी यंत्रसामुग्रीची निर्मिती व पुरवठा करण्यासाठी सहसचिव (साखर), अन्नपुरवठा, भारत सरकार यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती. या समितीच्या शिफारसी सर्व राज्यांना दि.10.06.1988 रोजीच्या पत्राने कळविण्यात आल्या होत्या.

त्यानंतर गेल्या अनेक वर्षापासुन साखर कारखानदारीवरील नियंत्रण कमी झाले असल्याची बाब एनसीडीसीने निदर्शनास आणल्यावरुन केंद्र शासनाने देखील संदर्भ क्र. 2 अन्वये पुरवठादारांची नोंदणी करण्याची पध्दती संपुष्टात आणली आहे. तसेच सर्व राज्यांचे साखर आयुक्त व संघ यांना देखील ही बाब संदर्भ क्र. 3 अन्वये एनसीडीसी ने कळविलेली आहे.

3/- केंद्र शासनाने दि. 23/06/2015 चे ऑफिस मेमोमध्ये नमूद केलेनुसार NCDC ने दि.2/07/2015 चे पत्रान्वये सर्व संबंधित राज्याचे साखर आयुक्त, साखर संघ इ.ना क्रिटीकल मशिनरी व साखर कारखान्यास आवश्यक मशिनरी पुरविणेबाबत पॅनल ठेवले जाणार नाही असे कळविलेले आहे.

तथापि, राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना संघ लि. (NFCSF) यांच्या दि.14/12/2017 रोजीच्या पत्रानुसार, प्लँट व मशिनरी तसेच क्रिटीकल उपकरणे पुरवठादारांची नोंदणी NCDC करणार नसल्याने सद्यस्थितीत 09 क्रिटीकल मशिनरीसह

Complete Sugar Plant on Turnkey Basis पुरवठादारांची नोंदणी करणेबाबतची प्रक्रीया NFCSF व्दारे करण्यात येत असलेबाबत कळविलेले आहे.

4/- सद्यस्थितीत NCDC स्तरावरील क्रिटीकल मशिनरी पुरवठादारांच्या नोंदणीचे कामकाज रद्द करण्यात आलेले असल्याने त्या धर्तीवर साखर आयुक्तालय स्तरावरील नॉन क्रिटीकल मशिनरी पुरवठादारांचे नोंदणीचे कामकाज चालु ठेवावे किंवा कसे याबाबतचा निर्णय घेण्याच्या अनुषंगाने दि.08.02.2019 व दि.18/2/2019 रोजी साखर आयुक्तालयामध्ये बैठक आयेजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीस पुरवठादार नोदणीसाठी गठीत केलेल्या समिती सदस्यांसह सचिव, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि. मुंबई, कार्यकारी संचालक, वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशन, पुणे, तात्रिक सल्लागार, वसंतदादा शुगर इस्टिट्युट, पुणे व इतर संबंधित उपस्थित होते.

सदर बैठकीमधील चर्चेनुसार, कारखान्यांना खुल्या अर्थव्यवस्थेचा लाभ घेता यावा, दर्जेदार मशिनरी रास्त किंमतीमध्ये नामांकीत कंपन्यांकडून उपलब्ध व्हावी याद्दष्टीने मशिनरी पुरवठादारांची नोंदणी बंधनकारक नसावी. तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 मधील सुधारणा अधिनियम 2013 नुसार सहकारी संस्थांना स्वायतत्ता देण्यात आलेली आहे. लेखपरिक्षक नियुक्तीचा अधिकार सहकारी संस्थांना प्राप्त झालेला आहे. त्याप्रमाणे पुरवठादारांची निवड करण्यासाठी सहकारी साखर कारखान्यांना स्वायतत्ता असणे आवश्यक आहे. भारतातील कोणत्याही राज्यामध्ये साखर आयुक्त स्तरावर मशिनरी पुरवठादारांचे पॅनल अस्तित्वात नसल्याबाबतचा मुद्या देखील विचारात घेण्यात आला. यावर साखर आयुक्त स्तरावरील नॉन क्रिटीकल मशिनरी पुरवठादारांचे नोंदणीचे कामकाज यापुढे सुरु ठेवावे किंवा कसे याविषयी लेखी अभिप्राय सादर करणेबाबत कळविण्यात आले होते.

5/- त्यानुसार सदर विषयाबाबत व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना संघ लि. नवी दिल्ली (NFCSF) यांनी दि.12.02.2019 रोजीच्या पत्रान्वये अभिप्राय सादर केलेले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र राज्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही राज्यांमध्ये राज्यस्तरीय साखर संघ / साखर आयुक्तालयामार्फत मशिनरी पुरवठादारांच्या नोंदणीचे (Vendors Registration) कामकाज केले जात नाही. देशातील सर्व सहकारी साखर कारखाने आणि संघ, NFCSF कडे नोंदणीकृत असलेल्या मशिनरी पुरवठादारांची निवड करतात. NFCSF व्दारे व्हेडर्स / मशिनरी पुरवठादारांची होणारी नोंदणी प्रक्रीया ही अत्यंत व्यावसायिक पध्दतीने व पात्रता निकष तपासून केली जाते. तसेच क्रिटीकलसह नॉन क्रिटीकल स्वरुपाच्या मशिनरी पुरवठादारांची नोंदणी ही NFCSF व्दारे केली जाते. साखर आयुक्तालयामार्फत स्वतंत्रपणे होणा-या मशिनरी पुरवठादारांच्या नोंदणीमुळे सदर कामकाजाची पुनरावृत्ती होते. सबब, साखर आयुक्त स्तरावरील पुरवठादारांच्या नोंदणीचे कामकाज बंद करण्यास हरकत नसलेबाबत NFCSF यांनी अभिप्राय सादर केलेले आहेत.

6/- यासंदर्भात खालील संस्थांनी देखील अभिप्राय दिलेले आहेत.

अ. महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ लि., मुंबई.

साखर कारखान्यांना नॉन क्रिटीकल मशिनरी खरेदी करीत असतांना नोंदणीकृत पुरवठादार असल्यास कारखान्यांची बोगस पुरवठादारांपासून फसवणूक होणार नाही व कारखान्यांना रास्त दरात योग्य ती मशिनरी मिळविणे सोयीचे होईल. सबब, पुरवठादारांची नोंदणी पध्दती साखर कारखान्यांच्या हिताची वाटते असे कळविलेले आहे.

ब. वेस्ट इंडियन शुगर मिल्स् असोसिएशन, पुणे.

साखर उद्योगामध्ये नवीन संशोधन व सुधारणा वेळोवेळी घडत असून ई-निविदा पध्दतीचा अवलंब होत आहे. सहकारी साखर कारखान्यांनी स्वजबाबदारीने व आर्थिक निकषाने कामकाज करणे अपेक्षित आहे. खाजगी साखर कारखाने स्वायत्ततापूर्ण असल्याने स्वजबाबदारीने कामकाज करीत असतात. यास्तव, पुरवठादारांची नोंदणी चालू अथवा बंद ठेवणेस विस्माची हरकत नाही.

क. वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट, पुणे.

वसंतदादा शुगर इन्स्टिटयूटने नोंदणीकृत पुरवठादारांकडून साहित्य खरेदी केल्यास मालाचा दर्जा योग्य राखण्यास मदत होते. सबब, पुरवठादारांची नोंदणी पध्दती साखर कारखान्यांच्या हिताची वाटते असे लेखी कळविलेले आहे.

7/- महाराष्ट्र शासनाच्या Ease of doing business या धोरणानूसार साखर कारखान्यांना मशिनरी खरेदी करताना कालापव्यय होऊ नये व खरेदी प्रक्रियेमध्ये सूटसूटीतपणा यावा याद्दष्टीने नोंदणी करण्याचे काम यापुढे रद्द करणे उचित राहील, अशी चर्चा करण्यात आली.

8/- साखर आयुक्तालयाच्या आस्थापनेवर आवश्यक तो तांत्रिक कर्मचारी / अधिकारी वर्ग नाही त्यामुळे नोंदणीसाठी प्राप्त झालेल्या कंपनीच्या विविध मशिनरी उत्पादनासंदर्भात नोंदणीची कार्यवाही करणे उचित वाटत नाही . तसेच वरीलप्रमाणे NCDC स्तरावरील मशिनरी पुरवठादारांचे पॅनलचे कामकाज रद्द करणेबाबतचा निर्णय, तसेच NFCSF यांचे याविषयाबाबतचे अभिप्राय विचारात घेता साखर आयुक्तालय स्तरावरील गठीत समितीव्दारे करण्यात येणारे नॉन क्रिटीकल मशिनरी पुरवठादारांच्या नोंदणीचे कामकाज यापुढे रद्द करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. तथापी, या विषयास अनुसरुन पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

1. राज्यातील सहकारी साखर कारखाने राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना संघ लि.,नवी दिल्ली यांचेकडे असणा-या नोंदणीकृत पुरवठादारांकडून यंत्रसामूग्री खरेदी करु शकतील.
2. याशिवाय सहकारी साखर कारखाने बाजारात उपलब्ध असलेल्या नामांकित पुरवठादारांकडून आवश्यक ती यंत्रसामूग्री व त्यांचे सूटे भाग यांची खरेदी करु शकतील.
3. सहकारी साखर कारखान्यांनी यंत्रसामूग्री खरेदी करताना पुरवठादाराचा अनुभव, त्याची तांत्रिक व आर्थिक क्षमता, यंत्रसामूग्रीचा दर्जा (ISI अथवा तत्सम) इ. बाबींची खात्री करुन यंत्रसामूग्री पुरवठादाराची निवड करावी.
4. साखर कारखान्यांनी यंत्रसामूग्री खरेदी करतांना ई-निविदा पध्दतीचा अवलंब करावा.
5. यंत्रसामूग्री खरेदीच्या अनुषंगाने पुरवठादार व साखर कारखान्यांमध्ये कांही वाद निर्माण झाल्यास योग्य त्या प्राधिकरणाकडे दाद मागण्याची दक्षता घेण्यात यावी.
6. कोणत्याही परिस्थितीत यंत्रसामूग्री खरेदी करताना पुरवठादाराकडून बोगस अथवा चूकीची सामुग्री पुरविली जाणार नाही, याबाबत कारखान्याने पुरेशी दक्षता घ्यावी. अशी शहानिशा न करता अथवा ई-निविदा प्रक्रिया न राबविता साखर कारखान्याचे आर्थिक नुकसान झाल्यास त्याची जबाबदारी सर्वस्वी संचालक मंडळ, कार्यकारी संचालक व कारखान्यातील संबंधित अधिकारी,कर्मचारी यांची राहील.

प्रस्तुत विषयाबाबतची या कार्यालयाने निर्गमित केलेली उपरोक्त दि. 10/10/2012 व दि. 31.07.2018 रोजीची परिपत्रके रद्द करण्यात येत आहेत. तसेच सदर विषयास अनुसरुन मशिनरी पुरवठादारांचे या कार्यालयास प्राप्त झालेले / नोंदणीसाठी विचाराधिन असलेले सर्व प्रस्ताव दप्तरी दाखल करण्यात येत आहेत. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(शेखर गायकवाड)
साखर आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत- माहीती तथा कार्यवाहीस्तव-

1.प्रादेशिक सहसंचालक (साखर) (सर्व)

यांना कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व सहकारी साखर कारखान्यांना पाठवुन परिपत्रकानुसार कार्यवाही करणेबाबत कळविण्यात यावे.

2. व्यवस्थापकीय संचालक, नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीज लि., नवी दिल्ली.

3. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर संघ म, मुंबई

4.महासंचालक, वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट, मांजरी, पुणे.

5.कार्यकारी संचालक, वेस्ट इंडियन शुगर असोसिएशन, पुणे.

प्रत -माहीतीस्तव सविनय सादर-

1. मा. प्रधान सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय (विस्तार), मुंबई.